**मुंबईत इमारतींची इतकी गर्दी होऊ लागली आहे की हिरवळ औषधालाही सापडेनाशी होऊ लागली आहे. अतिशहरीकरणाबरोबर येणारा बकालपणाही मुंबईचं सौंदर्य ओरबाडू लागला आहे. मात्र इर्ला इथला व्हर्टिकल गार्डनचा एक प्रयोग या वास्तवाला छेद देतो.**

सर्व फोटो: हेमंत पांचाळ










# किमया व्हर्टिकल गार्डनची

मुंबईत सगळ्यात महाग कुठली वस्तू असेल तर ती जागा. इथल्या इंच न इंच जागेला लाखो रुपये मोजावे लागतात. त्यामुळे मुंबईतलं घर असो वा दार, खूप ऐसपैस जागा फारशी दृष्टीस पडत नाही. (किमान मध्यमवर्गीय घरात तरी) महानगरांमध्ये जिथे राहण्यासाठी जागेची टंचाई आहे तिथे बाग-बगिच्याला जागा मिळणं केवळ अशक्य. मुंबईत लोकसंख्येच्या प्रमाणात उद्यानं नाहीत. त्यामागे जागेची अनुपलब्धता हेच मूळ कारण आहे. मग अशा परिस्थितीत काय करायचं? तर घरात बाग फुलवायची. त्यासाठी बाल्कनी गार्डन, किचन गार्डन, टेरेस गार्डन असे विविध पर्याय आहेत. त्यात व्हर्टिकल गार्डनचाही एक चांगला पर्याय असून त्याचे अनेक फायदेही आहेत.

**कसं असतं व्हर्टिकल गार्डन?**

उभ्या भिंतीसारखी असणारी बाग म्हणजे व्हर्टिकल गार्डन. व्हर्टिकल गार्डनला ग्रीन वॉल, लिव्हिंग वॉल, इको वॉल, बायो वॉल, बायो बोर्ड असंही म्हणतात. या गार्डनमध्ये एखाद्या भिंतीला किंवा भिंतीसारख्या स्ट्रक्चरवर बाग विकसित करण्यात येते. त्यासाठी कुंड्या किंवा बॅगसारख्या विविध वस्तूंचा वापर करण्यात येतो.

व्हर्टिकल गार्डन ही संकल्पना १९८० मध्ये पॅट्रिक ब्लन्सने वापरली होती. पण त्याही पूर्वी १९३० मध्ये लॅण्डस्केप आर्किटेक्चरचे प्रोफेसर हर्ट व्हाइट यांनी अशा गार्डनचं पेटण्ट मिळवलं होतं.

व्हर्टिकल गार्डन हे घरात किंवा घराबाहेर विकसित करता येतं. मग ती भिंत घराची किंवा स्वतंत्ररित्या उभी केलेली असू शकते. या गार्डनसाठी फार जागा तर लागत नाही. हेच या गार्डनचं खास वैशिष्टय आहे. त्यामुळे एखादी भिंत उभी करण्यासाठी जेवढी जागा लागते तेवढीच जमिनीवरच्या जागेची व्हर्टिकल गार्डनसाठी लागते. उभी म्हणजे आकाशातली जागा मात्र गार्डनच्या उंचीप्रमाणे लागते. या गार्डनसाठी वापरण्यात येणाऱ्या भिंतीला एकावर एक अशा कुंड्या, बॉटल्स, बकेट्स किंवा बॅग्ज अडकवून त्यात रोपटी लावण्यात येतात. त्यात एकच काळजी घ्यावी लागते ती ही की ज्यात रोपटी लावायची आहेत ती कुंडी सरळ न ठेवता ती ३० अंश कोनात लावावी लागते. व्हर्टिकल गार्डनमधल्या झाडांना हाताने पाणी टाकता येतं किंवा पाइट लाइन टाकून ठिबक सिंचनही करता येतं. व्हर्टिकल गार्डनमध्ये जिओ टेक्सटाइल फॅब्रिक, ग्रोइंग मीडिया, इरिगेशन सिस्टिम, प्लाण्ट्स अशी अनेक मॉडेल्स वापरण्यात येतात. त्यात वेगवेगळ्या मटेरिअयल्स आणि डिझाइन्सचा समावेश होतो.

महानगरांमध्ये व्हर्टिकल गार्डन्स ही फार उपयुक्त संकल्पना आहे. अनेक हॉटेल्स आणि काही घरांमध्ये अशी अनेक गार्डन्स पाहायला मिळतात. पण अजूनही असंख्य घरांमध्ये अशी गार्डन्स बनवता येऊ शकतात. मुंबई उभी वाढत आहे. म्हणजे व्हर्टिकली डेव्हलप होत आहे. ठिकठिकाणी उंचउंच टॉवर्स उभे राहत आहेत. कारण जमिन मर्यादित आहे. अशा परिस्थितीत घरात अशी गार्डन्स विकसित केली तर आपण थोडा वेळ तरी निसर्गाच्या सानिध्यात राहू शकू. म्हणूनच व्हर्टिकल गार्डन ही संकल्पना काळाशी सुसंगतच आहे.

**व्हर्टिकल गार्डनचे फायदे**

व्हर्टिकल गार्डन तीन कारणांसाठी विकसित करण्यात येतात. उद्यानासाठी, सुशोभिकरणासाठी आणि शेतीसाठी. त्यामुळे व्हर्टिकल गार्डनचे फायदेही अनेक आहेत.

- आजची महानगरं क्राँक्रिटची जंगलं बनली आहेत. ती वाहतूक कोंडी, प्रदूषणाची माहेरघरंही आहेत. घरात किंवा घराच्या आवारात व्हर्टिकल गार्डन असेल तर रोजच्या दगदगीपासून मुक्तता मिळते.
- ताणतणाव कमी होण्यास मदत होते. बागेत रोपटी लावणं, त्यांना खत-पाणी देणं, त्यांची देखभाल करणं, हे ताणतणाव कमी करण्याचे उत्तम उपाय आहेत.
- व्हर्टिकल गार्डनमुळे शुद्ध हवा मिळते. ऑक्सिजन मिळतो. परिणामी आरोग्य सुधारतं.
- प्रवेशद्वार, बॅकड्रॉप किंवा फ्रेमवर्क म्हणूनही या गार्डनचा वापर करता येतो.
- घरातच आऊटडोअर गार्डनचा फील मिळतो. निसर्गाच्या सानिध्यात राहण्याचा अनुभव मिळतो.
- उष्णता कमी होते, वायू आणि ध्वनिप्रदूषणही कमी होतं. घरात एक आल्हाददायक वातावरण तयार होतं.
- घरातलं तापमान कमी झाल्याने वीजबचत होते. घरखर्चातही घट होते.
- घरातच भाजीपाला पिकवता येतो. सेंद्रिय पद्धतीने भाज्या पिकवता येतात.
- जैव-विविधता जपली जाते. विविध प्रकारची झाडं आणि फुलझाडं लावता येतात. विविध झाडांची कॉम्बिनेशन्स वापरता येतात.
- व्हर्टिकल गार्डनमध्ये बकेट्स, बॉटल्ससारख्या टाकाऊ वस्तू उपयोगात आणता येतात.
- घरातल्या पाण्याचा पुनर्वापर करता येतो.
- व्हर्टिकल गार्डनला अतिशय कमी जागा लागते. तसंच कमी जागेचा जास्त वापर करता येतो. शिवाय त्याची देखभाल करणंही सोपं आहे.
- एखादा भाग झाकून टाकायचा असेल तर तिथं व्हर्टिकल गार्डनच्या रूपाने भिंत उभी करता येते. त्यामुळे एकांत मिळण्यास मदत होते.
- व्हर्टिकल गार्डनचा इंटिरिअरमध्ये फार चांगल्या प्रकारे उपयोग करून घेता येतो. त्यात वेगवेगळी स्ट्रक्चर्स आणि डिझाइन्स वापरात येतात. त्यापासून ठराविक परिणाम साधता येतो. विविध लाइट्स आणि शेड्सही वापरता येतो.

**- राजेश वाघमारे**

rajesh.waghmare@timesgroup.com

## सार्वजनिक व्हर्टिकल गार्डन

मुंबईच्या अंधेरी(पश्चिम) भागातल्या एस.व्ही.रोडवर पब्लिक व्हर्टिकल बटरफ्लाय गार्डन नुकतंच उभारण्यात आलंय. हे केवळ मुंबईतलंच नव्हे तर देशातलं पहिलं पब्लिक व्हर्टिकल गार्डन आहे. आपल्याकडे फाइव्ह स्टार हॉटेल्स आणि मोठ्या घरांमध्ये व्हर्टिकल गार्डन्स पाहायला मिळतात. पण ती सार्वजनिक ठिकाणी कुठेच दिसत नाहीत. परदेशात मात्र अनेक शहरांमध्ये अशी व्हर्टिकल गार्डन्स आहेत. अंधरीतल्या इर्ला ब्रीजवरचं हे व्हर्टिकल गार्डन उभारलं आहे स्थानिक नगरसेवक अमित साटम यांनी. त्यामागे प्रेरणा होती शांघायमध्ये बघितलेल्या गार्डनची. इर्ला ब्रीज हा एका मोठ्या नाल्यावर बांधण्यात आलेला आहे.

पूर्वी या नाल्यात लोक कचरा टाकत. रात्रीच्या वेळी डेब्रीज टाकत. त्यामुळे या नाल्याचं पाणी नेहमीच तुंबत असे. त्यापासून दुर्गंधी आणि डासाची समस्या तर होतीच, पण व्हर्टिकल गार्डनमुळे या समस्या दूर झाल्या आहेत. या गार्डनमध्ये तब्बल तीन हजार झाडं लावण्यात आली आहेत. त्यात ॲस्पॅरागस, क्लोरोफिथम, धारवाड रीप, दुरंता अशा चार जातीच्या समावेश आहे. त्यातल्या प्रत्येक झाडाला स्वतंत्र फायबर कुंडी देण्यात आली आहे. प्रत्येक कुंडीत पाण्याची पाइप लाइन फिरवण्यात आली असून त्यात ठिबक सिंचन तंत्र वापरण्यात आलेलं आहे. एवढ्या कुंड्या एकावर एक लावण्यासाठी १९ मीटर लांब व ४ मीटर उंचीचं आणि ३ टन वजनाचं लोखंडी स्ट्रक्चर उभारण्यात आलं आहे. या स्ट्रक्चरच्या मध्यभागी फुलपाखराचा आकार देण्यात आलेला आहे.

पूर्वी इर्ला ब्रीजवरून जाताना लोकांना नाला आणि त्यातली घाण दिसायची. पण आता विविध प्रकाच्या झाडांनी बहरलेली बाग दिसते. नवख्या व्यक्तीला तिथे मोठा नाला असेल असं चुकूनही वाटत नाही. ब्रीजच्या एका बाजूला हे व्हर्टिकल बटरफ्लाय गार्डन बवण्यात आलं आहे. आता आजूबाजूचे रहिवासी ब्रीजच्या दुसऱ्या बाजूलाही असंच गार्डन विकसित करण्याची मागणी करत आहेत.





**प्रत्येक वस्तूला स्वतःचं असं व्यक्तिमत्व असतं आणि या व्यक्तिमत्वाचा बरा-वाईट परिणाम घरात राहणाऱ्या व्यक्तींवर नकळत होत असतो. म्हणूनच आपल्या वास्तूचं इंटिरिअर काळजीपूर्वक करा. केवळ गरज आहे ती उत्तम अभ्यासाची आणि तज्ज्ञांच्या सल्ल्याची.**

सुंदर माझं घर

# आखणी आणि नियोजनाचं महत्त्व

घराच्या इंटिरिअरच्या कामात सिव्हिल, प्लम्बिंग, फॉल्स सिलिंग, कार्पेण्टरी, इलेक्ट्रिकल, पेंटिंग, पॉलिश, फॅब्रिकेशन आदींशी संबंधित सात ते आठ एजन्सीचे कॉण्ट्रॅक्टर्स काम करतात. टाइल्स, रेती, सिमेंट, प्लायवूड, विनियर, लॅमिनेट, प्लम्बिंग फिटिंग्ज, वायर्स, लाइट फिक्स्चर्स, हार्डवेअर अशा अनेक मटेरिअल्सच्या डिलर्सबरोबरही डील करावं लागतं. कॉण्ट्रॅक्टर्स, वर्कर्स आण्डि डीलर्स यांच्याशी ताळमेळ ठेऊन आपलं इंटिरिअरचं काम आखलेल्या बजेटमध्ये आणि ठरवलेल्या वेळेमध्ये करून घ्यावं लागतं. बजेट काम ठेवण्यासाठी आणि कामाचा दर्जा उत्तम राखण्यासाठी आपल्या गरजांचं वर्गीकरण करून कामाची आखणी करा आणि त्या अनुषंगाने काम करून घ्या.

स्ट्रक्चरमध्ये कोणताही बदल करताना तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्या. सोसायटीची परवानगी घ्या. जाणते-अजाणतेपणी केलेल्या चुकांचे बदल भयंकर धोकादायक ठरू शकतात. पूर्ण इमारत कोसळू शकते. बेकायदेशीर बदलांसाठी तुरुंगवासही होऊ शकतो. म्हणूनच तज्ज्ञांचा सल्ला घेणं उत्तम.

एका छोट्या वन बीएचके फ्लॅटसाठी इंटिरिअरचा खर्च किती येऊ शकतो, याचा आपण अंदाज घेऊ या. सिव्हिल वर्कमध्ये प्लॅस्टर, वॉल कन्स्ट्रक्शन, फ्लोअरिंग, स्कर्टिंग वॉल टाइल्स, किचन प्लॅटफॉर्म, डोअर फ्रेम्स, विंडो फ्रेम्स इत्यादी कामाचा समावेश होतो. याचा खर्च साधारणपणे चार-पाच लाखांच्या घरात जातो.

लिव्हिंग रूममध्ये आणि बेडरूममध्ये प्लेन फॉल्स सिलिंग करून घेतल्यास साधारणपणे ४०,००० रुपये इतका खर्च येतो. टॉयलेट-बाथरूमच्या प्लम्बिंगचा खर्च लाखभर येतो. इलेक्ट्रिकल कामाचा खर्च सव्वा लाखापर्यंत होतो. प्लम्बिंग आणि इलेक्ट्रिकलच्या कामात भिंतीच्या आतली म्हणजे पाइपिंग आणि वायरिंग स्टण्डर्ड असतं. पण बाहेरच्या नळाची फिटिंग्ज आणि इलेक्ट्रिकल लॅम्प व फॅन्स याच्या निवडीवर एकंदरीत खर्च अवलंबून असतो.



घरातल्या भिंती रंगवण्यासाठी लस्टर फिनिश पेण्ट आणि ग्रील्ससाठी ऑइल पेण्ट वापरला तर खर्च ६० ते ७० हजारांपर्यंत जातो. डिझाइनर पेण्ट साधारणपणे (एका भिंतीसाठी) ५ ते १० हजार एवढ्या किमतीत येतो. पॉलिशचा खर्च साधारणतः १० ते २० हजारांपर्यंत येतो. फॅब्रिकेशन वर्क म्हणजे ग्रील बनवण्यासाठी ४० हजारांपर्यंत खर्च येतो. सुतारकामामध्ये टीव्ही युनिट, डायनिंग युनिट, शू-रॅक, किचन प्लॅटफॉर्म शटर्स, ओव्हरहेड स्टोअरेज, बॉक्स टाइप डबल बेड, साइड टेबल्स, डबल वॉर्डरोब इतकं फर्निचर बनवून घेतलं तर खर्च अंदाजे दोन-अडीच लाखांवर जातो. तसंच किचन ट्रॉलीज, डायनिंग टेबल, सेण्टर टेबल, सोफा सेट, पडदे इत्यादीचा खर्च दीड लाखापर्यंत जातो.

एकत्रित हा खर्च दहा-बारा लाख होतो. पण थांबा, हा अगदी अथपासून इतीपर्यंतचा खर्च आहे. म्हणजे संपूर्ण कायापालट करण्यासाठीचा आहे. पण जुन्या घरातून नवीन घरात येताना काही सामान घेऊन येतो. तसंच नवीन घरातल्या सगळ्याच गोष्टी बदलतो असं नाही. म्हणूनच हा दहा-बारा लाखाचा खर्च पाच-सहा लाखावर येतो. वर नमूद केलेल्या कामामधलं काम अंशतः केल्यास हा खर्च तीन-चार लाखांपर्यंतही येऊ शकतो. म्हणूनच कामाची आणि बजेटची आखणी उत्तम झाली पाहिजे. या सगळ्यासाठी एका तज्ज्ञ आणि अनुभवी इंटिरिअर डिझाइनरच्या मदतीने आपल्या घराचा इंच न इंच अप्रतिमरित्या वापरता येतो.

आजकालच्या धावपळीच्या युगात दिवसभराच्या धकाधकीनंतर जेव्हा आपण घरी येतो, तेव्हा आपल्याला रिफ्रेश व रिचार्ज होण्याची गरज असते. ही गरज आपली माणसं आणि आपलं घर पूर्ण करतात. आपलं घर म्हणजेच घराचं इंटिरिअर. बजेट कमी असलं तरीही लक्षःपूर्वक, विचारपूर्वक प्लॅनिंग केल्यास आपल्याला अपेक्षित असलेला लूक साकारता येतो.

**- अजित मधुकर सावंत**

**( इंटिरिअर डिझायनर )**

ajitmadhukarsawant@gmail.com

# महत्त्व मंगल कलशाचं

शालाकर्म या विधीमध्ये वीतभर आकाराचं स्थंडिल करून अग्निस्थापना करतात. त्यात 'अच्युताय भौमाय' अशा आहुती देतात. घराच्या कोपऱ्यात पहारीने किंवा मुसळीने हलकेच ठोकून त्या-त्या कोपऱ्यात तुपाची धार सोडून घराचं स्वेदन केलं जातं.

गृहप्रवेश हा विधी मुहूर्ताप्रमाणे सर्वप्रथम किंवा शेवटी किंवा कर्म मध्यात केला जाऊ शकतो. यासाठी मुहूर्ताचं महत्त्व लक्षात घेणं जरुरीचं आहे. गृहप्रवेशामध्ये कलशाचं फार महत्त्व आहे. दरवाजाच्या वरच्या चौकटीत मंगल कलशाची स्थापना करावी असा शास्त्रसंकेत आहे. परंतु आपल्याकडे दरवाजाच्या वर निरनिराळ्या देवतांच्या मूर्ती स्थापन करतात. समजा एखाद्या कंपनीच्या जनरल मॅनेजरला वॉचमनच्या केबिनमध्ये बसायला सांगितलं तर काय होईल? त्याचप्रमाणे याचा सर्वांगाने विचार होणं आवश्यक आहे. सर्व देवदेवतांची जागा ही देव्हाऱ्यातच आहे. हिंदूंच्या प्रत्येक देवतेच्या शक्तीचा मान राखणं हे प्रत्येक हिंदूचं आद्यकर्तव्य आहे. हिंदूंच्या पुरातन ग्रंथ, वेगवेगळी प्रतीकं आणि शुभ चिन्हं, वेगवेगळ्या देवता यामध्ये कुठे ना कुठे वैज्ञानिक अर्थ दडलेला आहे. याचं उत्तम उदाहरण म्हणजे श्री गणपती देवता. 'गण' म्हणजे 'समुदाय' आणि 'पति' (किंवा ईश) म्हणजे स्वामित्व असणारा (नियंत्रण करणारा) तो गणपति अथवा 'गणेश'. वैज्ञानिक भाषेत सांगायचं तर परमाणू (Sub Atomic Particles), अणू (Molecule) आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या सर्व जड पदार्थांवर स्वामित्व असणारी किंवा नियंत्रण करणारी शक्ती म्हणजे 'गणपती' देवता अथवा गणेश देवता. ऋग्वेद २-२३-१ मध्ये खालील ऋचा सापडते.

*गणांना त्वा गणपति हवामहे*
*कवि कविनामपमश्रवस्तमम्*
*ज्येष्ठराजं ब्रह्माणां ब्रहाणस्पत*
*आ न शृण्वं नूतिभिः सीद सादनम् ।।*

भावार्थः हे ध्वनीशास्त्राचा गुरु गणपति, 'ब्रह्माणस्पत' हे सूक्त मी तुला अर्पण करतो. हे ब्रह्माला जेष्ठ असलेला कवींचा कवी, या नव्या रचनेवर ध्यान दे व माझं रक्षण कर.

गणपतीचे एकूण तीन उल्लेख आहेत.

**अ)** ब्रह्मणस्पती – ऋषीकडून वेद रचण्याच्या आधी ब्रह्मणस्पतीने (पहिला गणपति) ध्वनी प्रकारावरून त्या उच्चाराला रूप (Form) देऊन माहेश्वरी ध्वनी पद्धतीची योजना केली. या पहिल्या गणपतीला वरील सूक्त अर्पण केलं आहे. यामध्ये गणपती देवतेचा अंतर्भाव होत नाही.

**ब)** व्यास मुनीकृत जय ग्रंथ (भारत) लिहिणारा दुसरा गणपती



**क)** राजा गणपती नाग – तिसरा गणपती. याने अक्षरांवर 'शिरोरेखा' पद्धत अवलंबिली आणि त्याप्रमाणे पुढे देवनागरी लिपी अस्तित्वात आली. (अशोक-ब्रम्ही लिपी संस्कृत लिहिण्यास योग्य नव्हती) याच देवनागरी लिपीमध्ये पुराणं लिहिली गेली. 'ॐ' अक्षर सोडून प्रत्येक अक्षरांवर 'शिरोरेखा' देण्याची सूचना करण्यात आली. ऋषींनी ब्रह्मणस्पतीला-पहिल्या गणपतीला हा मंत्र अर्पण केलेला आहे. अशा या पूर्णस्वरूप ब्रह्मांडनायक गजाननाला घराच्या प्रवेशद्वाराच्या वरती बसवणं मला संयुक्त वाटत नाही. याची जागा देव्हाऱ्यातच आहे आणि प्रवेशद्वाराच्या चौकटीवर मंगल कलशाची स्थापना करणं मला योग्य वाटतं.

**क्रमशः**

**- डॉ. तुषार यशवंत सावडावकर**

mataartnedit@gmail.com